**प्रेसनोट** 09.06.2022

**अभिजीत भारत गिरीगोसावी, डाटा एन्ट्री ऑपरेटर-माळशिरस पंचायत समिती कार्यालय व सर्जेराव बाबुराव लोखंडे, रोजगार सेवक मारकडवाडी ग्रामपंचायत, ता. माळशिरस जि. सोलापूर यांच्यावर लाच स्विकारलेबाबत कारवाई**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | सोलापूर घटक |
| गुन्हा नोंद क्रमांक | माळशिरस पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलम – ७ प्रमाणे |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १. अभिजीत भारत गिरीगोसावी, वय- २४, पद- डाटा एन्ट्री ऑपरेटर, (कंत्राटी) माळशिरस पंचायत समिती कार्यालय, माळशिरस रा. पंढरपूर<br>२. सर्जेराव बाबुराव लोखंडे, वय-४५ पद- रोजगार सेवक, (रोजगार हमी योजना) मारकडवाडी ग्रामपंचायत, ता. माळशिरस, जि. सोलापूर |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १०००/- रु. |
| स्विकारण्यात आलेली रक्कम | २००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांना रमाई घरकुल योजनेच्या अंतर्गत घरकुल मंजुर झाले असून बांधकामाचे जॉबकार्ड व हजेरीपट देण्यासाठी माळशिरस पंचायत समिती कार्यालयातील डाटा एन्ट्री ऑपरेटर अभिजीत भारत गिरीगोसावी यांनी प्रत्येक हजेरीपटास २००/- रू. याप्रमाणे १०००/- रू. लाचेची मागणी करीत असलेबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर या कार्यालयाकडे दि.०९/०६/२०२२ रोजी तक्रार प्राप्त झाली होती.<br>सदर तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता यातील आलोसे क्र.०१ अभिजीत भारत गिरीगोसावी यांनी घरकुल योजनेच्या झालेल्या कामाच्या तिसऱ्या हजेरीपटाकरीता २००/- रू. लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम आलोसे क्र.०२ श्री सर्जेराव बाबुराव लोखंडे पद-रोजगार सेवक यांच्याकडे देण्यास सांगितले. श्री सर्जेराव बाबुराव लोखंडे यांनी सदर लाचेची रक्कम स्वीकारताना दोघांना ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर येथील पथकाने रंगेहात पकडले आहे. सदर प्रकरणात दोन्ही आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले असून गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे. |
| मार्गदर्शन अधिकारी | श्री. राजेश बनसोडे, पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाप्रवि, पुणे<br>श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि, पुणे |
| पर्यवेक्षण अधिकारी | श्री. संजीव पाटील, सहा. पोलीस आयुक्त, लाप्रवि, सोलापूर |
| सापळा पथक | पोनि. चंद्रकांत कोळी, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, सोलापूर<br>पोलीस अंमलदार- पोना/ प्रमोद पकाले, पोकॉ/उमेश पवार, पोकॉ/गजानन किणगी, चापोकॉ/शाम सुरवसे, सर्व नेमणुक लाप्रवि, सोलापूर. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे सोलापूर जिल्हयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता :- पोलीस उप अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, रंगभवन चौक, सोलापूर.**

१. हेल्पलाईन टोल फ्रि क्रमांक :- १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर दुरध्वनी क्रमांक :- ०२१७- २३१२६६८
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे :- ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई :- ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी सोलापूर dyspacbsolapur@gmail.com

Kchandrakant

(चंद्रकांत कोळी)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो,सोलापूर